जा.क्र.वि.शा./निवडणुक कक्ष/ १३३९८/२०२४
पोलीस उप आयुक्त, वि.शा. कार्यालय,पुणे
दिनांक :- १६ /११/२०२४

<u>विषय</u> :- **भारतीय नागरिक सुरक्षा संहिता (बी.एन.एस.एस.) २०२३ चे कलम १६३ प्रमाणे**
ज्या विधासभा मतदार संघात जे मतदार नाहीत त्यांनी त्या मतदार संघात न थांबणेबाबत.

<u>आदेश,</u>

ज्याअर्थी, निवडणूक आयोग, भारत सरकार यांचे मुख्य निवडणुक अधिकारी, भारत सरकार यांचे प्रेसनोट क्र.ECI/PN/149/2024 DATE 15.10.2024 अन्वये महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणूका घेण्याचा कार्यक्रम जाहीर केलेला आहे. आचारसंहिता दिनांक १५/१०/२०२४ रोजी पासून निवडणूकीचा निकाल जाहीर होईपर्यंत अस्तित्वात राहील. महाराष्ट्रातील सर्व विधानसभा मतदार संघात मतदान दिनांक २०/११/२०२४ रोजी होणार आहे.

पुणे पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रात १९८ शिरुर, २०२ पुरंदर, २०३ भोर, २०८ वडगावशेरी, २०९ शिवाजीनगर, २१० कोथरुड, २११ खडकवासला, २१२ पर्वती, २१३ हडपसर, २१४ पुणे कॅन्टोंमेन्ट व २१५ कसबा पेठ या विधानसभा मतदार संघाचा समावेश आहे.

निवडणूक आयोग, भारत सरकार यांचेकडील पत्र क्र.४६४/आय.एन.एस.टी./२००७/ पी.एल.एन.-१, दिनांक ०८/०१/२००७ व दिनांक २७/०२/२००७ अन्वये प्रचार संपल्यानंतरच्या वेळेपासून मतदान प्रक्रिया पूर्ण होईपर्यंतच्या कालावधीत राजकीय व्यक्तींवर जर ते त्या मतदार संघाचे मतदार नसतील तर त्या मतदार संघात थांबणेबाबत प्रतिबंध करण्याबाबत सूचना दिलेल्या आहेत.

मतदान प्रक्रिया सुरळीत व शांततेत पार पाडणेसाठी, सार्वजनिक शांततेला व मालमत्तेला धोका पोहचू नये, सार्वजनिक शांतता बिघडू नये यासाठी सर्व राजकीय व्यक्तींना किंवा राजकीय पक्षाशी संबंधीत असलेल्या कोणत्याही व्यक्तींस ते ज्या विधानसभा मतदार संघाचे मतदार नाहीत, त्या विधानसभा मतदार संघात थांबणेस/वास्तव्य करण्यास प्रतिबंध करणे जरुरीचे आहे, अशी माझी खात्री झालेली आहे.

त्याअर्थी, मी रंजन कुमार शर्मा, पोलीस सह आयुक्त, पुणे शहर मला भारतीय नागरिक सुरक्षा संहिता (बी.एन.एस.एस.) २०२३ चे कलम १६३ अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा आदेश देतो की, महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ साठी पुणे पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रात दिनांक १८/११/२०२४ चे १८.०० वा. पासून ते दिनांक २०/११/२०२४ चे २४.०० वा. पर्यंत खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

१) सर्व राजकीय व्यक्तीं किंवा राजकीय पक्षाशी संबंधीत कोणतीही व्यक्ती ते ज्या विधानसभा मतदार संघाचे मतदार नाहीत, त्या मतदार संघात थांबणेस / वास्तव्य करणेस प्रतिबंध करण्यात येत आहे.

सदर आदेशाचे उल्लंघन करणारी व्यक्ती भारतीय न्याय संहिता कलम २२३ अन्वये शिक्षेस पात्र राहील.

सदरचा आदेश माझे सही शिक्यानिशी आज दि.१६/११/२०२४ रोजी दिला आहे.

ठिकाण :- पुणे शहर
दिनांक :-१६/११/२०२४

(रंजन कुमार शर्मा)
पोलीस सह आयुक्त,
पुणे शहर